# नांदगावपेठमध्ये अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटचा भंडाफोड

## चार लाखांचा मुद्देमाल जप्त; 58 गॅस सिलेंडरांसह आरोपीला अटक

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 12) :** नांदगाव पेठ परिसरातील शासकीय वसाहतीत अवैध गॅस रिफिलिंगचा मोठा रॅकेट उघडकीस आला आहे. पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत 58 एलपीजी सिलेंडर, तीन रिफिलिंग मशिनेसह वजनकाटे जप्त करण्यात आले असून, एकूण चार लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणात साबिर लष्कर हाशिम लष्कर (40, रा. शासकीय वसाहत, नांदगाव पेठ) याला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे शुक्रवारी दुपारी 3.30 वाजता पोलिसांनी छापा टाकला. एका घरात मोठ्या प्रमाणात एलपीजी सिलेंडर साठवून त्याची अवैध रिफिलिंग होत असल्याचे उघड झाले. आरोपी सिलेंडरमधून गॅस काढून ऑटोचालक व इतर ग्राहकांना विक्री करीत



असल्याचेही तपासात समोर आले आहे. या धोकादायक कारभारामुळे कधीही भीषण स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. कारवाईदरम्यान जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून सर्व सामग्री जप्त करण्यात आली. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त गणेश शिंदे व सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या देखरेखीखाली ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, उपनिरीक्षक नवलकर, पोलिस हवालदार राऊत, निलेश साविकर, राजा सय्यद, राजिक खान आणि वैभव तिखिले यांचा सहभाग होता. सायंकाळनंतर याप्रकरणात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु होती.

---

### अमरावती जिल्हा परिषद निवडणूक रणधुमाळी रंगणार

# जिल्हा परिषद अध्यक्ष पदावर महिलाराज

- सातव्यांदा आरुढ होणार महिला अध्यक्ष
- अध्यक्ष पद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव





**आतापर्यंत असलेल्या महिला अध्यक्ष**

| नाव | वर्ष | पक्ष |
|---|---|---|
| सुमन सरोदे | 1994-1995 | भा.रा.काँ. |
| उषा बेठेकर | 1997-1998 | भा.रा.काँ. |
| विद्या वाटाणे | 1999-2000 | भा.रा.काँ. |
| सुरेखा ठाकरे | 2000-2002 | रा.काँ.पा. |
| उषा उताणे | 2005-2007 | भा.रा.काँ. |
| सुरेखा ठाकरे | 2012-2014 | रा.काँ.पा. |

**सर्वसाधारण भागातील 12 पंचायत समिती सभापतीचे आरक्षण**

- अनुसूचित जाती - 1
- अनुसूचित जाती महिला - 2
- अनुसूचित जमाती - 1
- नागरिकांचा मागास प्रवर्ग - 2
- नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला- 2
- सर्वसाधारण - 2
- सर्वसाधारण महिला - 2

**चिखलदरा व धारणी पंचायत समिती सभापतीचे आरक्षण**

- अनुसूचित जमाती - 1
- अनुसूचित जमाती महिला - 1

**यामुळे मेळघाटातील आदिवासी समाजातील महिला नेतृत्वाला ऐतिहासिक संधी उपलब्ध झाली आहे.**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.12) :** मिनी मंत्रालय अशी ओळख असलेल्या जिल्हा परिषदेत आज आरक्षण जाहीर होताच निवडणुकीचे पडघम वाजायला सुरूवात झाले आहे.अमरावती जिल्हा परिषदेत पून्हा एकदा महिला राज येणार आहे. हे पद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव झाल्याने अध्यक्ष पदाची स्वप्न रंगविणाऱ्या पुरूष नेत्यांचा हिरमोड झाला आहे. तर इच्छुक महिलांनी तयारी सुरू केली आहे.

अमरावती जिल्हा परिषदेत एकूण 59 सदस्य आहेत. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदावर आजवर सात महिलांची वर्णी लागली आहे. मागील साडेतीन ते चार वर्षापासून प्रशासकाची नियुक्ती असलेल्या अमरावती जिल्हा परिषदेत आठ वर्षापासून काँग्रेसची सत्ता होती.काँग्रेसचे बबलु देशमुख यांच्याकडेच अध्यक्ष पदाची सूत्रे होती. आता सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी अध्यक्षपदाचे आरक्षण निघाल्याने निवडणुकीची रंगत वाढणार आहे. येत्या डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषदेची निवडणुक अपेक्षित आहे. त्या दृष्टीने भाजप, कॉंग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, मनसे, वंचित, रिपाईचे विविध गट, बसपा या पक्षांनी ग्रामीण भागात निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.

---

# चारचाकीतून गोवंश तस्करी

## 6 लाख 19 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 12)** अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या गोवंश पथकाने मोठी कारवाई करत बोलेरो पिकअप वाहनातून क्रूरतेने बांधून नेण्यात येत असलेली तब्बल 16 जनावरे ताब्यात घेतली आहेत. या कारवाईत सुमारे 6 लाख 19 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 12 सप्टेंबर रोजी गोवंश पथकाचे पो.उपनिरीक्षक विशाल रोकडे हे पथकासह कुर्हा पोलीस ठाण्याच्या



हद्दीत गस्त घालत होते. यावेळी गुप्त माहितीच्या आधारे चेनुष्टा फाट्याजवळ नाकाबंदी करण्यात आली.

कौंडण्यपूरकडून कुहा गावाकडे जात असलेली बोलेरो पिकअप थांबवण्याचा प्रयत्न होताच वाहनातील आरोपी पळून गेले. मात्र, शोध घेतल्यावर आरोपी अब्दुल फहीम अब्दुल खलील हा मिळून आला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये गोवंशीय जातीची एकूण 16 जनावरे पाय व तोंड बांधून अमानुषपणे कोंबून नेण्यात येत असल्याचे आढळले. जप्त जनावरांची किंमत सुमारे 1 लाख 19 हजार रुपये तर बोलेरो पिकअप वाहनाची किंमत 5 लाख रुपये एवढी असून, एकूण 6 लाख 19 हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. जप्त जनावरे व वाहन पुढील कार्यवाहीसाठी कुहा पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक विशाल रोकडे, पोलीस अंमलदार संतोष तेलंग, दीपक पाल, राजेश कासोटे, दीपक पाटील व चालक किशोर सुने यांनी केली.

---

# महिलेची सात लाखांहून अधिकची फसवणूक

## दोन आरोपींवर गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 12) :** कर्ज काढून देण्याचे आमिष दाखवून शिरजगाव कसबा हद्दीतील गुरुदेवनगरात राहणार्या एका महिलेची तब्बल 7 लाख 36 हजार रुपयांने फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार 11 सप्टेंबर रोजी उघडकीस आला आहे. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलीस स्टेशनमध्ये एका आरोपी महिलेसह श्रीकांत राऊत (43, रा. मिल कॉलनी, परतवाडा) यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादी आशा अनिलराव बदुकले (रा.गुरुदेवनगर, शिरजगाव कसबा, चांदुरबाजार) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत करून त्यांना लोन काढून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर वारंवार पैशांची मागणी केली. अखेरीस त्यांनी एकूण 7,36,000/- रक्कम दिली. मात्र, लोन न मिळवून दिले नाही.

त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे आशा बदुकले यांच्या लक्षात आले. असे आशा बदुकले यांनी तक्रारीत नमूद केले आहे. सदर घटनेवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

---

# आज राष्ट्रीय लोक अदालत

**अमरावती :** अमरावतीसह राज्यातील सर्व न्यायालयात शनिवार, दि. 13 सप्टेंबर 2025 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात दाखल व दाखलपूर्व प्रकरणे तडजोड व सामंजस्याने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. अमरावती येथील लोकअदालतीचे उद्घाटन नागपूर खंडपिठाचे न्यायमुर्ती प्रविण पाटील यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सूचनेनुसार राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाहीत. तडजोडपात्र प्रलंबित खटले राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ठेवण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा.

---

# चांदूरबाजारात मुलाकडून वडिलांचा खून

महासागर | प्रतिनिधी

**चांदूरबाजार, (दि. 12)** चांदुरबाजारात कौटुंबिक वादातून एक भीषण घटना घडली असून, मुलानेच वडिलांचा खून केल्याची घटना शुक्रवारी (दि.12) चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी आरोपी मुलाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोपाल माणिक सोसे (42, रा. पिंपरी पूर्णा) यांनी चांदूरबाजार पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्यांचे व लहान भाऊ महेश माणिक सोसे यांचे वडील माणिक यशवंतराव सोसे (75) यांनी खाऊटीच्या रकमेकरिता न्यायालयात दावा दाखल केला होता. न्यायालयाने भरणपोषणाची रक्कम न दिल्याने त्यांच्याविरुद्ध पकड वॉरंट काढले होते. त्यानंतर रक्कम भरूनही महेश सोसे याने या गोष्टीचा राग मनात धरला. दरम्यान, शुक्रवारी महेश याने वडिलांसोबत वाद घातला. संतापाच्या भरात त्याने लोखंडी पाईपने डोक्यावर प्रहार केला. गंभीर जखमी झालेल्या माणिक सोसे यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. चांदूरबाजार पोलिसांनी आरोपी महेश माणिक सोसे याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

---

# नरभक्षी वाघाच्या बंदोबस्तासाठी खासदारांकडून तातडीची बैठक

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि. 12) -** हरीसाल, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अंतर्गत येणाऱ्या हरीसाल परिसरात वाघाच्या हल्ल्यात नागरिकांचा बळी गेल्याच्या पार्श्वभूमीवर, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आज वनविभागाची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत गेल्या वर्षभरात वाघाच्या हल्ल्यात 7 नागरिकांचा मृत्यू झाल्याची गंभीर बाब समोर आली.

यावेळी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे, मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत परिसरातील गंभीर परिस्थितीवर चर्चा करण्यात आली. वाघाच्या हल्ल्यांमुळे केवळ मनुष्यहानीच नाही, तर अनेक पाळीव प्राण्यांनाही जीव गमवावा लागला आहे. तसेच, वन्य प्राण्यांकडून शेतीपिकांचे



मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने आदिवासी बांधवांचे जीवन संकटात सापडले आहे. या नुकसानीची योग्य भरपाई तातडीने मिळावी, अशी जोरदार मागणी या बैठकीत करण्यात आली.

परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या नरभक्षी वाघाला त्वरित जेरबंद करण्यात यावे, ही या बैठकीतील प्रमुख मागणी होती. यासोबतच, वनविभागात काम करणाऱ्या वनमजुरांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला. सर्व वनमजुरांचा तातडीने विमा काढण्यात यावा आणि त्यांना जंगलात काम करताना आवश्यक सुरक्षा साधने पुरविण्यात यावीत, यावरही चर्चा झाली.

या सर्व गंभीर विषयांवर तातडीने तोडगा काढण्यासाठी येत्या पंधरा दिवसांच्या आत प्रधान मुख्य वनसंरक्षक (क्ष्टष्ट्स्न) आणि वनबल प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय बैठक बोलावण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

या बैठकीसाठी उपवनसंरक्षक (ष्टष्ट्स्न) किर्ती जमदाळे, वनविभागाचे इतर अधिकारी , अमरावती जिल्हा परिषदेचे माजी सभापती महेंद्र गैहरवाल व दयाराम काळे, धारणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रोहित पटेल,विलास बोरेकर, राजेश सेमलकर, गंगा जावरकर, अमरावती ग्रामीण युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पंकज मोरे कालू मालवीय. शेख मुखत्याला. राजकिशोर मालवीय यांच्यासह मेळघाट परिसरातील शेकडो आदिवासी नागरिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# पोषण महिन्यानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 12) :** कुपोषण आणि अशक्तपणासारख्या समस्या दूर करण्यासाठी, तसेच सर्वांगीण आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात पोषण महिन्यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. 'राष्ट्रीय पोषण महिना' अभियानांतर्गत महिला व बाल विकास विभाग आणि इतर संबंधित विभागांच्या सहकार्याने हे उपक्रम राबवले जात आहेत.

12 सप्टेंबरपासून महिना पोषण महिना साजरा केला जाणार आहे. या अभियानाचा उद्देश लहान मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांमध्ये योग्य पोषणाबद्दल जागरूकता वाढवणे आहे. सही पोषण, देश रोशन हे घोषवाक्य घेऊन हे अभियान राबवले जात आहे. या अंतर्गत अंगणवाड्या, शाळा आणि ग्रामीण भागांमध्ये आरोग्य तपासणी शिबिरे, पोषण आहाराचे महत्व सांगणारे प्रदर्शन, तसेच पौष्टिक पाककृतींचे प्रात्यक्षिक आयोजित केले जाणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून केवळ पोषणविषयक समस्यांवरच नव्हे, तर स्वच्छता, लसीकरण आणि आरोग्यदायी सवयींवरही भर दिला जात आहे. तसेच लठ्ठपणा नियंत्रणात साखर आणि तेलाचे सेवन कमी करणे, प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण, पोषण भी ङ्क पढाई भी, एक पेड माँ के नाम, बाल व लहान मुलांच्या आहार पद्धती, मेन स्ट्रीमींग, व्होकल फॉर लोकल आदी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून निरोगी जीवनासाठी योग्य आहाराची निवड करण्याचे महत्त्व सांगितले जाणार आहे. जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन मुलांना आणि महिलांना संतुलित आहाराबद्दल माहिती देतील. या उपक्रमांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, बचत गट आणि महिला मंडळेही सक्रियपणे सहभागी होतील. यासाठी जिल्हा परिषेदेने महिन्याभरात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे, त्यानुसार उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी कळविले आहे.

---

# इलेक्ट्रिक वायर चोरी प्रकरणाचा पर्दाफाश

## सहा गुन्ह्यांची उकल, चोरीचा साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त ■ अमरावती गुन्हे शाखेची धडक कारवाई



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 12) :** गाडगेनगर, राजापेठ, फ्रेजरपुरा आणि खोलापुरी गेट परिसरातील नव्या बांधकामांवरून होत असलेल्या इलेक्ट्रिक वायर चोरी प्रकरणाचा अखेर गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी दोन सराईत चोरट्यांना ताब्यात घेतले असून, चौकशीत आणखी दोन जणांचा सहभाग उघड झाला आहे. या कारवाईत तब्बल साडेतीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी शहरात मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे आदेश दिले होते.

त्याअंतर्गत गुन्हे शाखेच्या टीमने गुप्त बातमीदाराच्या मदतीने संशयितांविषयी माहिती मिळवली. शुक्रवारी सकाळी 10.30 वाजता पेट्रोलिंगदरम्यान जहीर खान उर्फ राजा नाडा जमिर खान (31, रा. अकबर नगर) व शेख अजरुद्दीन शेख कमरुद्दीन (21, रा. अकबर नगर) यांना ताब्यात घेण्यात आले.

### या पथकाची कारवाई

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त रमेश धुमाळ, गणेश शिंदे, घुगे व सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलिस हवालदार सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, झहीरुद्दीन, नाझीमोद्दीन सय्यद, अतुल संभे, राहुल ढेंगेकर व पोलीस अमलदार रणजित गावंडे यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

### चौकशीत सहा गुन्ह्यांची कबुली

चौकशीदरम्यान आरोपींनी गाडगेनगर, राजापेठ, फ्रेजरपुरा व खोलापुरी गेट हद्दीत घडलेल्या सहा गुन्ह्यांमध्ये सहभागाची कबुली दिली. त्यांनी नव्या बांधकामांवरून इलेक्ट्रिक वायर ओढून चोरी केली व नंतर वायर जाळून त्यातील तांबे विकले. याशिवाय, गाडगेनगरातील असोरिया पेट्रोलपंपाजवळील एका बंद गोडाऊनमधून ॲल्युमिनियम सेक्शन चोरी करून ते भेगार खरेदी करणाऱ्यांना विकल्याचेही समोर आले.

### अटक आणि जप्ती

या प्रकरणात चोरलेला माल विकत घेणारे जियाउल हसन इमदाद अली (63, रा. जमिल कॉलनी) व अब्दुल वाहेद अब्दुल मुजीब (23, रा. जमिल कॉलनी) यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी 2 लाख 88 हजार रुपये किमतीचे तांबे व 50 हजार रुपयांचे ॲल्युमिनियम सेक्शन असा एकूण 3 लाख 38 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

---

# दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार, महिलेचा विनयभंग

## ग्रामिण हद्दीत महिला अत्याचाराच्या तीन घटना



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 12) :** जिल्ह्यातील ग्रामिण भागात महिला लैंगिक अत्याचाराच्या तीन घटना 11 सप्टेंबर रोजी उघडकीस आल्या आहेत. वरुड तालुक्यात एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाला, तर एका महिलेचा विनयभंग करण्यात आला आहे. तर वर चिखलदरा तालुक्यात एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण करण्यात आले आहे.

पोलिस तक्रारीनुसार, चिखलदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका 16 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. तिला लग्नाचे आमिष दाखवून तिचे शारिरिक शोषण करण्यात आले. याप्रकरणात पिडितेच्या तक्रारीवरून आरोपी करण किशोर बेठेकर (22) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. दुसरी घटना वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. उन्हाळ्याच्या सुट्टीत आईकडे राहायला आलेल्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. हा प्रकार कुणाला सांगितला, तर मारण्याची धमकी दिली. दरम्यान 9 सप्टेंबर रोजी मुलीने डॉक्टरकडे जाऊन तपासणी केली असता ती गर्भवती असल्याचे आढळून आले. हा प्रकार उघड होताच पिडिताने वरुड ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी राहुल रामुजी युवनाते (27, रा. वरुड तालुका) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला, पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

### वरुडमध्ये महिलेचा विनयभंग

वरुड तालुक्यात राहणार्या एका 40 वर्षीय महिलेचे विनयभंग केल्याची घटना पुढे आली आहे. महिलेच्या तक्रारीनुसार तीची ओळख आरोपी उमेश मुकेश कोल्हटकर (35, रा. वरुड तालुका) याच्याशी झाली होती. महिलेचे कापडाचे दुकान आहे. आरोपी हा दुकानासमोर येऊन महिलेला इशारे करीत होता. त्याने विनयभंग केल्याची तक्रार महिलेने वरुड ठाण्यात नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी उमेश कोल्हटकरविरुध्द गुन्हा नोंदविला.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पोखरली जात आहे महाराष्ट्र-मध्यप्रदेशची सीमा.....






अमरावती-चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव पोलीस स्टेशन अंतर्गत हद्दीत मुरुम चोर गेल्या काही महिन्यांपासून जेसीबी लावून या प्रकारे महाराष्ट्र व मध्यप्रदेशची सीमा याप्रमाणे पोखरत आहे, ही मुरुम चोरी थांबविण्याकरिता शासन-प्रशासन फोल ठरताना दिसत आहे.

# मेळघाटातील नरभक्षी वाघाला जेरबंद करणार!

## वनमंत्र्यांचे आश्वासन

### आमदार केवलराम काळे यांचा पाठपुरावा

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती/धारणी, (दि. 12) :** वनमंत्र्यांनी नरभक्षी वाघाला जेरबंद करून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या हद्दीतून बाहेर सोडण्याचे स्पष्ट निर्देश दिले. तसेच, तारू बांधा परिसरात झालेल्या वाघ हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या वनमजुरांच्या





पत्नीला अनुकंपा तत्वावर वनविभागात तात्काळ नोकरी देण्याचे आदेशही वनमंर्त्यांनी दिले. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या हद्दीत गेल्या सहा महिन्यांपासून नरभक्षी वाघामुळे होत असलेल्या जीवहानीच्या गंभीर समस्येबाबत आज दिनांक 12 सप्टेंबर 2025 रोजी मुंबई मंत्रालयात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीचे नेतृत्व माननीय वनमंत्री गणेश रामचंद्र नाईक यांनी केले. या बैठकीस मेळघाटचे आ.केवलराम काळे, बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवि राणा व्हिडीओ कॉन्फरंसींगद्वारे उपस्थित होते.

बैठकीत अमरावतीचे मुख्य वनसंरक्षक, नागपूर येथील प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनसंपदा) नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), अमरावती मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक व वनसंरक्षक, उपवनसंरक्षक, तसेच इतर उच्च अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत आमदार केवलराम काळे यांनी मेळघाटातील नागरिकांच्या सुरक्षेसंदर्भात आणि नरभक्षी वाघामुळे होणाऱ्या जीवहानीच्या समस्येवर ठोस पाठपुरावा केला. त्यांनी स्पष्ट केले की, नरभक्षी वाघामुळे गावकऱ्यांच्या शेतजमिनी, पाळीव प्राणी यासह मानवजातीलही प्रचंड धोका निर्माण होत आहे. त्यामुळे त्यांना तातडीने उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे, असे त्यांनी सरकारकडे विनंती केली.

# धारणी नगरपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी मानधनाविना

## 17 सप्टेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

महासागर | प्रतिनिधी

**धारणी, (दि.12) :** धारणी नगरपंचायत पाणीपुरवठा विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी गेल्या चार महिन्यांपासून मानधनाविना काम करत आहेत. मानधन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना उपासमारीची स्थिती निर्माण झाली आहे.

पाणीपुरवठ्याचे कंत्राट रिद्धी वेंचर संस्थेकडे असून, ही संस्था मानधन देण्यात विलंब करत असल्याचा कर्मचारी वर्गाचा आरोप आहे. नगरपंचायत मुख्याधिकारी यांना निवेदन दिल्यानंतरही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.



कर्मचाऱ्यांनी इशारा दिला की, मानधनाचा प्रश्न सोडविला गेला नाही तर 17 सप्टेंबर 2025 पासून ते बेमुदत कामबंद आंदोलन छेडले जाईल. या आंदोलनामुळे शहरातील पाणीपुरवठा खंडित होण्याची शक्यता असून त्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेवर असल्याचे कर्मचाऱ्यांचे मत आहे. नागरिकांचे दैनंदिन जीवन पाणीपुरवठ्यावर अवलंबून असताना प्रशासनाचे दुर्लक्ष चिंताजनक असल्याचे सर्व स्तरांतून व्यक्त केले जात आहे. निवेदन देतेवेळी चंद्रकांत घनबहादुर, नितीन तंतरपाळे, राहुल मुरकुटे, शेख करीम, गजानन जांभेकर, परमानंद जांभेकर, ससाणे, रोशन पटेरकर, वासुदेव बार्व्हन व धर्मा तेलगोटे आदी उपस्थित होते.

# सिट्रस इस्टेट उमरखेडमार्फत प्रक्षेत्र भेट, प्रशिक्षण कार्यक्रम

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि.12) :** तालुक्यातील चिखलसावंगी, दापोरी, सालबर्डी, डोंगरयावली आणि गणेशपूर येथे उमरखेड येथील सिट्रस इस्टेट च्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रक्षेत्र भेट व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात उपविभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर, सिट्रस इस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय तळेगावकर, पी आर पोटे कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य व वरिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. अनिल ठाकरे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक संजय नवले यांची प्रमुख उपस्थिती झाली. यावेळी अजय तळेगावकर यांनी सिट्रस इस्टेटसंदर्भात सविस्तर माहिती दिली आणि शेतकऱ्यांनी सदस्यत्व नोंदणी करून उपक्रमाचा लाभ



घेण्याचे सांगितले. संजय नवले यांनी शेतकऱ्यांनी नवीन शेतीसंबंधी संधींचा फायदा घेऊन उद्योजकतेकडे वळावे, असे मार्गदर्शन केले. तसेच उज्वल आगरकर यांनी शेतकऱ्यांना कृषी विभागाद्वारे उपलब्ध शासकीय योजना व त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमांतर्गत वरिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. अनिल ठाकरे यांनी संत्रा फळगळ व्यवस्थापन, कीड नियंत्रण व एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. तसेच प्रश्न तुमचे उत्तर आमचे या संकल्पनेवर शेतकऱ्यांच्या शंका निरसन करण्यात आले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शन मिळाले तसेच शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ घेण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी प्रथमेश माने, मंडळ कृषी अधिकारी दिनेश चौधरी, उप कृषी अधिकारी फुले, सहाय्यक कृषी अधिकारी अंधारे, कोल्हे, चिखले, काळे, यावले, काजळकर, आत्मा सल्लागार समिती सदस्य प्रशांत राऊत, पोलीस पाटील देशमुख आणि शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# करजगाव तंटामुक्त समिती अध्यक्षपदी रामानंद बेलसरे

महासागर | प्रतिनिधी

**करजगाव, (दि. 12) :** ग्रामपंचायतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महसूल तंटामुक्त समिती अध्यक्ष पदी रामानंद सुभाषराव बेलसरे यांची नुकतीच बिनविरोध निवड केली.

चांदूरबाजार पंचायत समिती अंतर्गत सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून करजगाव ग्रामपंचायतीची ओळख आहे. या ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच इंदिरा वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी तंटामुक्त समिती अध्यक्ष पदी रामानंद सुभाषराव बेलसरे यांची निवड झाली. त्यांच्या नियुक्तीवर माजी उपसरपंच सोनू उर्फ महेंद्र कांडलकर, ग्रामपंचायत सदस्य मोहसीन, संगीता



आगलावे, ग्रामविकास अधिकारी सुहास कोठेकर, तसेच स्वप्निल सावरकर, संदीप रहाटे, अफजल, जावेद इकबाल, निलेश भोकरे, अमोल इंगळे, अब्दुल अहमद या ग्रामसभेला उपस्थित होते, या सर्वांनी बेलसरे यांचे अभिनंदन केले.

# अंजनगाव बारीत शेतकरी पीएम-किसान योजनेच्या लाभापासून वंचित

## पाच वर्षांपासून विविध शासकीय कार्यालये झिजवूनही न्याय मिळेना

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, (दि.12) :** अंजनगाव बारी येथील शेतकरी अजय शामराव माहेकर (सर्व्हे क्र. 228/1/अ) गेल्या पाच वर्षांपासून पीएम-किसान योजनेचा आर्थिक लाभ मिळवू शकत नाहीत. त्यांनी आवश्यक कागदपत्रे वेळेवर सादर केली असूनही त्यांच्या अर्जाला मंजुरी मिळत नाही, अशी तक्रार त्यांनी केली आहे.

अजय माहेकर यांनी सांगितले की, त्यांनी कृषी विभागात जाऊन पूर्ण कागदपत्रांची पूर्तता केली, परंतु तहसील कार्यालयातून त्यांची योजनेतून नोंदणी न करता फेटाळण्यात आली. अमरावती कृषी विभाग तसेच स्थानिक कृषी




सहाय्यक यांकडूनही त्यांना योग्य तो प्रतिसाद किंवा मदत मिळालेली नाही. यामुळे ते आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले असून कुटुंबावर आर्थिक ताण वाढला आहे. शेतकरी अजय माहेकर यांनी वारंवार शासकीय कार्यालये झिजवून न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला, तरीही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे त्यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार नोंदवण्याचा इशारा दिला आहे.

पीएम-किसान योजनेचा लाभ मिळविण्यासाठी प्रशासनाने त्वरीत आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी संबंधित शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# जामगाव खडका येथे शाळा, अंगणवाडीत सापांचा वावर

## लहानग्यांच्या जीवितास धोका!

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, (दि.12)–** तालुक्यांतर्गत येत असलेल्या जामगाव खडका येथील जिल्हा परिषदेची शाळा व अंगणवाडी केंद्र परिसरात सापांचा वावर वाढल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहानग्या बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने ग्रामस्थ चिंतेत आहेत. गुरुवारी दुपारी बारा वाजताच्या दरम्यान अंगणवाडी व शाळेच्या परिसरात साप फिरताना दिसल्याची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ धाव घेतली. त्यांनी दक्षता दाखवत साप जिवंत पकडून जंगलात सोडला. या घटनेनंतर शिक्षक, शिक्षिका व अंगणवाडी सेविकांनी मुलांना सतर्क राहण्याचे आवाहन केले.

शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थी संख्या सध्या तुलनेने कमी असल्यामुळे परिसर शांत दिसतो, त्यामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढण्याची शक्यता अधिक असल्याचे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मुलांच्या जीवितास धोका संभवतो, त्यामुळे अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी वनविभागाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. शाळा परिसर स्वच्छ, झाडी-झुडपांपासून मुक्त व सुरक्षित ठेवण्यासाठी संबंधित प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. मुलांचे शिक्षण सुरळीत व निर्भय वातावरणात सुरू राहावे, हीच पालकांची अपेक्षा आहे.



# स्वच्छता ही सेवा अभियान ग्रामपंचायतीने प्रभावीपणे राबवावे : संजिता महापात्र

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.12) :** स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने दरवर्षी 2 ऑक्टोबर रोजी स्वच्छ भारत दिवस साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर या वर्षी स्वच्छता ही सेवा (एसएचएस) अभियान 17 सप्टेंबर 2025 पासून 2 ऑक्टोबर 2025 पर्यंत राबवले जाणार आहे. जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी ग्रामपंचायतींना हे अभियान प्रभावीपणे राबवण्याचे आवाहन केले आहे.

या वर्षी स्वच्छोत्सव ही थीम निश्चित करण्यात आली आहे. अभियानादरम्यान तालुका व गावस्तरावर परिसर स्वच्छतेचे उपक्रम राबवले जातील. अस्वच्छ ठिकाणांची मॅपिंग करून सफाई करण्यात येईल. संस्था, प्रतिष्ठान व



गर्दीचे ठिकाणे स्वच्छ करण्यात येणार आहेत. सफाईमित्रांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न केले जातील. पर्यावरणपूरक आणि शून्य कचरा उत्सव साजरा केला जाणार आहे. तसेच स्वच्छ सुजल गाव, कचऱ्यापासून कला निर्माण व स्वच्छ स्ट्रीट फूड केंद्र यांसारखे उपक्रम राबवले जातील. याशिवाय 25 सप्टेंबर 2025 रोजी देशव्यापी श्रमदान मोहीम राबवली जाईल, ज्यात चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व गावांतील घटकांना सहभागी करून मोठ्या प्रमाणावर काम केले जाईल. विशेष ग्रामसभेद्वारे हागणदारी मुक्त व स्वच्छ सुजल गाव घोषित करण्याचा प्रयत्नही करण्यात येणार आहे. स्वच्छता ही सेवा 2025 मधील सर्व उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या विशेष आयटी पोर्टलवर (https://swach-hatahiseva.gov.in/] (https://swachhatahiseva.gov.in/) नोंदवले जातील, ज्यामुळे शासन स्तरावर यांचे निरीक्षण व सनियंत्रण केले जाईल. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र व जल जिवन मिशनचे प्रकल्प संचालक बाळासाहेब रायबोले यांनी ग्रामपंचायतींनी अभियान प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन केले आहे.

# खा.बळवंत वानखडे यांचा सिध्दार्थ विद्यालयाकडून सत्कार

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा (दि.12):** राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावतीच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या सिध्दार्थ विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय परतवाडा येथे नुकताच संसद सदस्य बळवंतराव वानखडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष दलितमित्र मधुकरराव अभ्यंकर होते. त्यांनी शालेय व्यवस्थापनाचे महत्त्व व शिक्षकांचे योगदान अधोरेखित करताना सांगितले की, दर्जेदार शिक्षण व समृद्ध शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शाळा अखंड प्रयत्नशील आहे.

अध्यक्षीय भाषणात मधुकरराव अभ्यंकर म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास साधण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिकांनी मेहनत घेतली आहे. तरीही शासनाकडून शिक्षण क्षेत्राकडे अपेक्षित पातळीवर लक्ष दिले जात नाही. राष्ट्रनिर्मितीचे मुख्य कार्य शिक्षकांवर अवलंबून असल्यामुळे त्यांच्या कार्याचे योग्य तो सन्मान आवश्यक आहे. म्हणूनच



आदर्श शिक्षक पुरस्काराद्वारे प्राचार्य दिनेश मोहोड, पर्यवेक्षक दीपक कळसकर, प्रा. संजय गोगे आणि प्रा. उध्दव कोकाटे यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी सन्मानित अतिथी खा.बळवंत वानखडे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, शाळेचे बाह्य स्वरूप पाहूनच त्याचा दर्जा लक्षात आला. तसेच विद्यार्थ्यांची शिस्त, संख्या आणि उत्साह पाहून खरोखरच आनंद वाटला. शाळेतील विद्यार्थी उज्ज्वल भवितव्य घडवत आहेत, असे प्रतिपादन केले. त्यांनी आश्वासन दिले की शाळेच्या तातडीच्या गरजेनुसार दोन डिजिटल वर्गखोलीचे शैक्षणिक साहित्य माझ्या निधीतून वितरण केले जाईल. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण साधनांचा फायदा मिळणार आहे.

संस्थेचे अध्यक्षा क्षितिज अभ्यंकर यांनी सांगितले की, संस्थेच्या स्थापनेपासूनच बहुजन समाजाच्या मुलांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. शाळेच्या विकासामध्ये कार्यरत प्राचार्य व शिक्षकांचे विशेष योगदान असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते वासुदेवराव वानखडे, सचिव गजाननराव वानखडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व नृत्य सादर केले. प्राचार्य दिनेश मोहोड यांनी शालेय प्रगती अहवाल मांडला. मंजुश्री मळसने यांनी कार्यक्रमाचे सुसंवेदनशील संचालन केले, तर तृप्ती गुल्हाणे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप सादर केलेल्या 'वंदे मातरम' गीताने करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांनी मोठा परिश्रम घेतला.

# संगई इंग्लिश स्कूलमध्ये जनजागृती कार्यशाळा



महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, (दि.12) :** स्व. बाळासाहेब संगई स्मृती सभागृहामध्ये सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी अंतर्गत रायसाहेब मोती संगई इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत 10 सप्टेंबर 2025 रोजी कचरा व्यवस्थापनावर जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे मार्गदर्शन प्रफुल्ल गायकवाड यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट केले व त्याच्या उपयोगितेबाबत सविस्तर माहिती दिली. आपल्या परिसराची स्वच्छता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचे पाच महत्त्वाचे तत्व कमी वापरा (रेड्युस), पुन्हा वापरा(रियुज), पुनर्वापर करा (रिसायकल), नकार द्या(रिफ्युज), दुरुस्त करा (रिपेअर) याबाबत मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तरे व विविध खेळाच्या माध्यमातून त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व प्रभावी पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले. याशिवाय, त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेसंदर्भात चांगल्या सवयी अंगीकारण्याचे प्रोत्साहन दिले. कार्यशाळेला शाळेच्या मुख्याध्यापिका अंशुजा तळणकर, उपमुख्याध्यापिका विश्वजा दर्यापूरकर, समन्वयिका सांत्वना कथे तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. तिसऱ्या ते आठव्या इयत्तेतील एकूण 400 विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला. कार्यशाळेचा यशस्वी संचालन होत शाळेला महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# ऐतिहासिक 'समर्थ रामगीर महाराज मंदिर' जिर्णावस्थेत

## समाधी मंदिराला 472 वर्ष पूर्ण

महासागर | पवन इंगोले

**अंजनगाव बारी, (दि.12) :** ऐतिहासिक 472 वर्षे पुरातण वास्तु श्री समर्थ रामगीर महाराज यांच्या समाधी मंदीराचे बांधकाम पूर्णत: जिर्ण झाले असून, खचण्याच्या स्थितीत आहे. यात्रा महोत्सवाचे दिवसात आता या मंदीरावर चढून रंगकामही करता येणे शक्य नाही.

या देवस्थानाला आजतागायता 7 पिढ्यांची परंपरा लाभली आहे. दरवर्षी या ठिकाणी डिसेंबर महिन्यात यात्रा महोत्सवाचे आयोजन केल्या जाते. यावेळी मतदार संघातील आमदार, खासदार, समाजसेवक, प्रतिनिधी आपली आवर्जुन हजेरी लावतात व मुख्य मंदीराच्या जिर्णोद्धाराचे आश्वासन देऊन मोकळे होतात. यात आजपर्यंत 6 ते 7 लाखांपर्यंतची तुरळक बांधकामेही आमदार निधीतुन झाली आहे, मात्र महत्वाचे समाधी मंदीराचा



जिर्णोध्दार केंव्हा होणार हा प्रश्न अद्यापही सुटला नाही. शासणामार्फत या देवस्थानाला 'क' दर्जा प्राप्त झाला आहे, मात्र



तिर्थक्षेत्र निधीपासुन ही वास्तु अद्यापही वंचित आहे. या मंदीराच्या जिर्णोध्दार कार्याची सरासरी रक्कम बघीतली तर ती 1 कोटीच्या घरात आहे. यासाठी नुसती लोकवर्गणी पुरेसी नसुन शासकीय तिर्थक्षेत्र निधीची यासाठी प्रमुख आवश्यकता आहे.

### नाल्यावर पूल आवश्यक

या देवस्थानाचे मुख्य प्रवेशव्दारासमोर पावसाळ्यात मोठा नाला वाहत असतो. यामुळे याठिकाणी पुलाची योजना असणे ही गरजेचे आहे. संबधीत ग्रामपंचायत मार्फत आतापर्यंत हे काम न झाल्याने याची दखल घेणे सुद्धा महत्वाचे ठरते. मंदीराचा जिर्णोध्दार व पुलाचे बांधकाम झाल्यास भाविक भक्तांना कधीही मंदीरात जाण्याची व येथे विविध सामाजिक कार्यक्रम राबविण्याची सोय होईल.

